महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य,३, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/२२६४११५१
ई-मेल:- director@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ: www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १९/परदेशी शिष्यवृत्ती योजना /२०१९-२०/ दिनांक : २१ जून, २०१९

## "जाहिरात"

### उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०१९-२० करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा./ अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण | १० | १० | २० |

ज्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत व ज्या विद्यार्थ्यास परदेशातील THE /QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आंत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका किंवा पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी गुणवत्तेनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी

मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २०.०० लाखापेक्षा जास्त नाही अश्या विद्यार्थ्याकडून या योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसोबत सदर अर्ज संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी सादर करावा.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र अर्जासोबत अपलोड करणे | दि. २१ जून २०१९ पासून<br>दि. १३ जुलै, २०१९<br>( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |
| २ | online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी संबंधीत विभागीय कार्यालयात सादर करणे.<br>• कला, वाणिज्य, विज्ञान व विधी अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण.<br>• व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण. | दि. २४ जून, २०१९ पासून<br>दि.१५ जुलै, २०१९<br>( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता उपरोक्त दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१८ तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ पहावेत. सदर शासन निर्णय व शुध्दीपत्रके शासनाच्या www.maharashtra.gov.in व या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादीसुध्दा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई